CNRMHPA220008412022

**नियमीत फौजदारी खटला क्र. १४४/२०२२**

**महाराष्ट्र शासन वि. सदाशिव उर्फ बबन**

## आदेश नि. १ खाली

अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचे प्रकरण आरोपीविरूध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४, ४९८–अ, ३२३, ५०४, ५०६, ५०१ आणि माहीती तंत्रज्ञान (सुधारणा) अधिनियम, २००८ चे कलम ६७ प्रमाणे दाखल केले आहे. याकामी दि.०५/०२/२०२४ रोजी आरोपीविरूध्द दोषारोप नोंदवण्यात आला व प्रकरण पुराव्यासाठी नेमले. तद्नंतर याकामी आरोपी गैरहजर राहिल्यामुळे त्याच्याविरूध्द अजामीनपात्र अधिपत्र काढले. आज रोजी संबंधित तामीली अधिकारी यांनी नि. १९ कडे अजामीनपात्र अधिपत्राचा अहवाल दाखल करून त्यामध्ये आरोपी सदाशिव उर्फ बबन हा मयत झाला असल्याचे कथन केले आहे. तसेच अहवालासोबत आरोपी सदाशिव उर्फ बबन याच्या मृत्यु दाखल्याची स.शि.प्रत दाखल केली आहे. त्याचे अवलोकन करता आरोपी हा दि. १५/०६/२०२५ रोजी मयत झाला असल्याचे दिसुन येते. आरोपी हा मयत झाला असल्याने सदरचा खटला हा घटीत करणे आवश्यक आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. सदरचा खटला घटित (Abate) करण्यात येते.

२. आरोपीची वैयक्तीक व जामीनदाराची बंधपत्रे रद्द करण्यात येतात.

३. येणे प्रमाणे प्रकरण बंद करण्यात येते.

MANISHA MAHADEO PATIL

Digitally signed by MANISHA MAHADEO PATIL
Date: 2026.06.16 15:50:55 +0530

**दिनांक: १६/०६/२०२६**

**(मनिषा म. पाटील)**

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पालम.**